## प्रकरण पहिले

# 'डी.बी. रत्नाकर यांचे वाङ्मयीन चरित्र'

- **प्रस्तावना**
    - शिक्षण
    - जडण घडण
    - साहित्य
    - मिळालेले विविध वाङ्मय पुरस्कार
    - विविध संघटना व चळवळीशी असणारा संबंध

-----

## प्रकरण पहिले

# डी.बी. रत्नाकर यांचे वाङ्मयीन चरित्र

१९२० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भारताच्या राजकीय पटलावर प्रवेश झाला आणि एकूणच राजकीय, सामाजिक सूत्रे बदलून गेली. त्यामुळे गावकुसाबाहेरील हजारो वर्षे अंधारात असणारा समाज उजेडाच्या दिशेने वाटचाल करण्यास सरसावला. या समाजाच्या पिढ्या न् पिढ्या चालत आलेल्या गुलामगिरीला बाबासाहेबानी सुरुंग लावले. यामुळे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात आपले वर्चस्व राखणारा प्रस्थापित वर्ग हादरला.

हजारो वर्षे ज्यांनी प्रकाशच पाहिला नाही, त्या अंधाराच्या प्रवाशांना बाबासाहेबानी सूर्योन्मुख करून त्यांच्या हाती क्रांतीची धगधगती मशाल दिली. त्यामुळेच वेसीबाहेरचा समाज जागा झाला. क्रांतीसन्मुख झाला. शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा बाबासाहेबानी दिलेला क्रांतीमंत्र घेऊन तो बंडासाठी सज्ज झाला. यातूनच महाडची क्रांती झाली. बाबासाहेबानी 'मनुस्मृती' जाळून इथल्या परंपरावादी, कर्मठ व्यवस्थेला, धर्माला आणि धर्मग्रंथांना एक प्रचंड हादरा दिला. हजारो वर्षांचा काळोख संपला. दलितांना या सूर्यतेजात आपल्या अस्तित्वाची जाणिव झाली. मी कोण ? या प्रश्नातच त्यांना आपले स्वत्व गवसले. त्यातूनच पिढ्या न् पिढ्यांचा काळोख फाकून नवी पहाट आली. दीन दलित समाज क्रांतीप्रवन् झाला आणि हजारो वर्षांच्या गुलामगिरीनंतर प्रथमच त्याने आपला हक्क मागितला.

ज्या धर्माने इथल्या माणसाला माणूसपण नाकारले त्या धर्माची तो चिकित्सा करू लागला. यातूनच इथल्या सवर्ण संस्कृतीला हादरे बसू लागले. १९२७ ला महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करून व मनुस्मृतीला जाळून या व्यवस्थेविरोधी बाबासाहेबानी रणशिंग फुंकले. त्याच्या गगणभेदी आवाजाने खेड्यापाड्यांतील दलित वर्ग जागा झाला. १९५० साली भारतीय 'संविधान' आले. या भारतीय संविधानाने मानवी मूल्यांचा स्वीकार केल्याने भारतीय समाजजीवनात अमुलाग्र बदल घडून आले. तळागाळातील लोकांना स्वत:ची स्वतंत्र अस्मिता जपत जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक दृष्ट्या उपेक्षित राहिलेल्या समाजाला स्वत:ची अशी भाषा मिळाली. त्यातच डॉ. बाबासाहेबानी लाखो अनुयायांसह केलेल्या धम्मातरामुळे भारताच्या सामाजिक पटलावर फार मोठी उलथापालथ झाली. त्यामुळे दलितांच्या अस्मितेला नवी दृष्टि आली. डॉ.बाबासाहेबानी

संविधानात केलेल्या तरतूदींचा १९५० नंतर नेमका काय परिणाम झाला याचा प्रत्यय पहिल्या पिढीच्या साहित्यावरून येतो. परंपरावादी हिंदू व्यवस्थेमध्ये जगावे लागणारे गुलामीचे जीणे, सोसाव्या लागणाऱ्या अनंत यातना, तसेच स्वत:ला धर्मरक्षक म्हणविणाऱ्यांच्या कर्मठ कारस्थानाविरोधी जबरदस्त आवाज घेऊन, वेदना, विद्रोह आणि नकार घेऊन १९६० च्या दशकात दलित साहित्य प्रवाह मराठीमध्ये आला. परंपरावादी रूढींना, गुलामीला नकार देऊन माणसाला मोल देणारा हा प्रवाह समता, स्वातंत्र्य, बंधुता या वैश्विक सूत्रांचा पुरस्कार करू लागला.

१९६० नंतर मराठी साहित्याच्या प्रांतात 'दलितसाहित्य' हा प्रवाह अत्यंत प्रभाविपणे कार्यरत झाला. हजारो वर्षे बंद असलेली भाषा विद्रोहाचे रूप घेऊन साहित्याच्या माध्यमातून बाहेर पडली. या प्रखर विद्रोहाचे आदिरूप डॉ. बाबासाहेब हेच होते. म्हणून दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब हेच आहेत. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीच्या उदयापूर्वी म. फुलेंच्या लेखनातून शुद्रातिशुद्रांच्या वेदना व्यक्त झाल्या आहेत. मात्र त्यातून स्वतंत्र साहित्य निर्मितीचा प्रवाह निर्माण झाला नाही ही वस्तुस्थिती आहे. आंबेडकरपूर्व काळात जी साहित्य निर्मिती झाली ती एक ऐतिहासिक टप्पा म्हणून महत्त्वाची आहे. मात्र त्यात केवळ नकाराला स्थान होते. या ऐतिहासिक वाङ्मयाला वेदना, विद्रोह, नकार, मानवी मूल्यांचा स्वीकार हा नवा आयाम आंबेडकरी तत्त्वज्ञानाने मिळाला. यातूनच दलित साहित्य अवतीर्ण झाले. वेदना, विद्रोह, चीड, नकार, संताप हे सगळे प्रथम काव्याच्या रूपाने बाहेर पडले. नंतरच्या काळात मात्र कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र या सर्वच प्रकारांत ते विस्तारलेले आज आपण पाहतो आहोत. डॉ. बाबासाहेबाची आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाची प्रेरणा घेऊन निर्माण झालेल्या साहित्यालाच 'दलित सहित्य' असे संबोधले गेले. दलित साहित्य प्रवाहात आजतागायत अनेकांनी लेखन प्रपंच केलेला आहे आणि तो चालूही आहे. याचा प्रवाहातील कवी डी.बी. रत्नाकर यांच्या समग्र कवितेचा या प्रबंधिकेमध्ये विचार केलेला आहे.

धम्मपाल रत्नाकरांचा जन्म हातकणंगले तालुक्यातील 'यळगूड' या खेड्यात १५ मार्च, १९६६ रोजी अत्यंत गरीब दलित कुटुंबात झाला. घरची अत्यंत गरीबी असतानाही त्यांच्या आईवडिलांनी, आपलेही पोरगं बाबासाहेबावानी मोठ झालं पाहिजे म्हणून त्यांना शाळेत घातले. कवी रत्नाकरांच्या पूर्वी त्यांच्या घरात कोणीही शिकलेले नव्हते. कोणत्याही प्रकारचा शैक्षणिक वारसा नसताना रत्नाकरांनी उच्च शिक्षण घेतले.

घरातली घरंदाज गरीबी असतानाही त्यांनी परिस्थितीवर मात करून शिक्षण घेतले. आपल्या तत्कालीन स्थितिविषयी कवी रत्नाकर सांगतात, ''आईवडिल दोघेही आडाणी. माझ्या बालपणीच मोठ्या बहिणीचं लग्न झालं. मी घरात एकूलता एक. मी मुळचा हुशार पण घरंदाज गरीबीमुळे हुशारीसुद्धा गरीब झाली. मी खूप शिकावे ही आईवडिलांची इच्छा. आईने मिळल ते काम केले. वडिलांनी चाकरी सुद्धा केली.''[१] अशा बिकट परिस्थितीवर मात करत करत रत्नाकरांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

धम्मपाल रत्नाकर यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेचे 'कुमार विद्या मंदिर, यळगूड' येथे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत पूर्ण झाले. पुढे हायस्कूलसाठी ते रयत शिक्षण संस्थेचे 'न्यू इंग्लिश स्कूल, हुपरी' येथे जावू लागले. तिथे त्यांनी इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्याच कोल्हापूरातील शाहू कॉलेजमधून पूर्ण केले व एम्.ए.चे शिक्षण शिवाजी विद्यापीठात मराठी विषय घेऊन पूर्ण केले. निव्वळ एम्.ए. ची डिग्री घेऊन ते थांबले नाहीत. तर त्यांनी पुढे ''नामदेव ढसाळ यांच्या साहित्याचा अभ्यास'' असा विषय घेऊन शिवाजी विद्यापीठाची पीएच्.डी. ही पदवी संपादित केली. आपल्या घरातील अठराविश्व दारिद्र्यावर मात करून रत्नाकरांनी शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच त्यांना हॉटेलमध्ये नोकरी करावी लागली. ही नोकरी त्यांनी प्राध्यापक होईपर्यंत केली. हॉटेल कामगार म्हणून काम करत शिक्षण पूर्ण करत असतानाच त्यांचा अनेक मोठ्या माणसांशी, चळवळीशी निकटचा संबंध आला. त्यात शहाजीकुमार चंदनशिवे यांसारखी जिव्हाळ्याची माणसे भेटली व रत्नाकर सर्वांगीन घडत गेले. हॉटेलमध्ये केलेल्या कामाचे, पाहिलेल्या-अनुभवलेल्या माणसांचे, क्षणांचे, अपमानांचे, दु:खाचे आणि या सर्वात दडलेल्या समतेच्या हॉटेल विश्वाचे चित्रण त्यांनी आपल्या कवितेतून घडविलेले आहे.

विद्यार्थी दशेपासूनच त्यांचा संबंध आंबेडकरी आणि इतर पूरोगामी संघटना, चळवळींशी आला. विद्यार्थी असतानाच ते राजा ढाले यांनी स्थापन केलेल्या 'स्टुडंट मुव्हमेन्ट' (याचे नामकरण पुढे ''प्रशीक विद्यार्थी संघ'' असे करण्यात आले) या संघटनेशी त्यांचा संबंध आला. आंबेडकरी चळवळीतील चढउतार, दुफळी, सत्तेचे राजकारण हे सर्व त्यांनी अनुभवले. ते म्हणतात, ''आंबेडकरी चळवळीतील चढ-उतार विद्यार्थी दशेपासून मी पाहत आलो आहे.''[२] पुढे त्यांचा अनेक चळवळीशी संबंध आला. आपल्या अनुभवांचा, बौद्धिकतेचा इतरांनाही उपयोग व्हावा म्हणून त्यांनी

साहित्य क्षेत्रातही आपला वेगळा ठसा उमटविला आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी १९९१-९२ पासून 'शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर' येथे अध्यापनाचे काम सुरू केले. त्याच महाविद्यालयात सन १९९५ पासून ते मराठीचे विभागप्रमुख म्हणून आजतागायत काम पाहताहेत.

साहित्य क्षेत्रात कवी रत्नाकरांनी आपला असा वेगळा ठसा उमटविलेला आहे. त्यांनी वेळोवेळी लिहिलेले, वैचारिक, सामाजिक, समीक्षात्मक लेख हे त्या त्या वेळी वृत्तपत्रे, नियतकालिके, दैनिके, वाङ्मयीन नियतकालीकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचे एकूण तीन कवितासंग्रह व दोन संपादने व आगामी काही नवे लेखन असा साहित्य प्रपंच आहे. त्यांचे कविता संग्रह व संपादने खाली क्रमवार दिलेली आहेत.

१) 'हॉटेल माझा देश', सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, ६ डिसेंबर, १९९२.

२) 'लक्तरांची गझल', नीहारा प्रकाशन, पुणे, ६ डिसेंबर, १९९४.

३) 'सैतानाच्या खांबावर', समृद्धी प्रकाशन, कोल्हापूर, ६ डिसेंबर,२००३.

४) 'विसावा', संपादित कविता संग्रह, समृद्धी प्रकाशन, कोल्हापूर,१९९५.

५) दलित साहित्याच्या नामांतराचा वाद.

ही व आगामी 'हॉटेल लाईन' नावाची कादंबरी व अन्य लेखन प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्यांच्या या वाङ्मयाचे वाचकांनी स्वागत केलेले आहे. त्यांच्या या साहित्यसंपदेला अनेक मान सन्मानही मिळालेले आहेत. विशेषत: त्यांच्या २००३ साली प्रकाशित झालेल्या 'सैनाताच्या खांबावर' या काव्यसंग्रहाला वाङ्मयीन क्षेत्रातले काही पुरस्कार मिळालेले आहेत. ते म्हणजे -

१) राज्यशासनाचा सन २००३-२००४ चा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी असलेला 'अण्णाभाऊ साठे' साहित्य पुरस्कार.

२) मिरज येथील 'शब्दांगण' साहित्य संस्थेचा कवी चैतन्य माने 'शब्दांगण काव्य पुरस्कार', २००५.

३) यशवंतराव चव्हाण काव्य पुरस्कार, पुणे, २००४.

४) कविवर्य नारायण सुर्वे काव्य पुरस्कार, पुणे, २००४.

प्रामुख्याने कवी रत्नाकरांचा विद्यार्थी दशेपासूनच विविध चळवळीशी संबंध आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रशीक विद्यार्थी संघ | – जिल्हा अध्यक्ष |
| २) | फुले-आंबेडकरी साहित्य परिषद | – सदस्य |
| ३) | आम्ही साहित्य चळवळ | – संस्थापक सदस्य |
| ४) | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा | – कार्यवाह |
| ५) | फुले-शाहू-आंबेडकर टिचर्स असोशिएशन | – केंद्रिय सदस्य |

या व अशा अनेक पुरोगामी सामाजिक, साहित्यिक चळवळींशी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. रत्नाकरांनी चळवळ ही आपली बांधिलकी मानलेली आहे.

वरील सर्व गोष्टी पाहिल्यानंतर त्यांची वाङ्मय निर्मितीमागे नेमकी भूमिका काय होती याचा मागोवा घेता येईल. कवी धम्मपाल रत्नाकर ज्या सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीतून आले. प्रतिकुल स्थितीतही त्यानी शिक्षण घेतले याचे साद-पडसाद त्याच्या कवितेत आढळतात. कवी ज्या समाजात मोठा झाला, ज्या माणसांनी त्यांना आपल्या अंगाखांद्यावर खेळविले ती माणसे, तो समाज रत्नाकरांच्या लेखणाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. फुले-आंबेडकरी चळवळीशी नाते सांगणारी कोणतीही व्यक्ती आपली सामाजिक बांधिलकी कधीही झुगारत नाही. परिणामी त्याच्या चिंतनाचा विषय माणूस हाच असतो. कवी रत्नाकरांची कविता ही याचाच परिपाक आहे. ती माणसाची, माणसाला केंद्रिभूत मानणारी कविता आहे.

स्वातंत्र्यानंतरचे सर्वसामान्यांचे छिन्न-विछिन्न झालेले पोटभर भाकरीचे स्वप्न ते पुरे न करू शकलेले स्वातंत्र्य, याच प्रवृत्तीला आपल्या राजकीय स्वार्थासाठी आणि खूर्चीच्या राजकारणासाठी खतपाणी घालणारे नेतृत्व. ‘स्व’ समाजाची दिशाभूल करून आपली घरे भरणारे नेते. स्वत:ला पुरोगामी म्हणवून घेऊन प्रतिगाम्यांच्या गोटात वावरणारे, सत्तेसाठी स्वाभिमान विकणारे नेते. या सर्वांवर उपरोधाने बोलत कवी रत्नाकरांची कविता अवतीर्ण झालेली आहे. ज्यांनी इथल्या उपेक्षित शुद्रातिशुद्रांना, दलितांना माणूस असल्याचा आत्मविश्वास दिला त्या महामानवांचा आज सत्तेसाठी चाललेला बाजार, पूर्वीपासून चालत आलेली पण आज नव्या स्वरूपात असलेली चातुर्वर्ण व्यवस्था, तिचा बदललेला चेहरा याच्या चिंतनातून कवी रत्नाकरांची कविता आलेली आहे. ‘१५ ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ट’ म्हणणाऱ्या कवी नामदेव ढसाळांच्या शैलीचा धागा पकडून व डॉ. बाबासाहेबाच्या क्रांतीगर्भ विचारांचा वारसा घेऊन कवी रत्नाकर आपले लेखन करताना दिसताहेत. व्यवस्थेच्या कुरूपतेवर, वर्णवर्चस्वावर, स्पृश्या-स्पृश्यतेवर त्यांनी महात्मा फुल्यांचा आसूड ओढलेला आहे.

म्हणून त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू हा अखिल जगतातला चिरडला, भरडला गेलेला, शोषला गेलेला माणूस आहे. कवी रत्नाकरांची कविता ही माणसापासून सुरू होते व माणसांपाशी येऊन थांबते, आणि तिथून पुढेच नवसृजनाची पहाट आहे हे सूचित करते. सर्वहारा माणसाला केंद्र करणारी ही कविता माणसाचे गाणे गाते आहे म्हणूनच कवी रत्नाकरांना हॉटेलमधील समता आकर्षित करून घेते. आणि या देशाला तोडून फोडून नवा आकार द्यायची अपेक्षा व्यक्त करते.

''हा देश फोडायचा
हॉटेलसारखा नवा आकार द्यायचा
हा देश...... एक हॉटेल
किचन रूम...... समतेचं
बाथरूम...... समतेचं
संडास ...... समतेचा
मुतारी ...... समतेची
कॅश काँऊटर...... समतेचं
स्टफ रूम...... समतेचं
जेवण...... समतेचं
पाणी...... समतेचं
....... माणसही समतेची.''

१ विधान करणे हे चांगल्या कवीचे आणि कवितेचे वैशिष्ट असते. नामदेव ढसाळांच्या सारखे कवी रत्नाकरही आपल्या कवितेतून विधान करतात.

फसला जाणारा आणि फसविणारा, शोषला जाणारा आणि शाषण करणारा अशी आजची समाजव्यवस्था आपण पाहतो आहे. या समाज व्यवस्थेला रत्नाकरांची कविता नकार देते. डॉ. बाबासाहेबाच्या क्रांतीगर्भ विचारांने पेटून माणसाच्या कल्याणासाठी अडथळा ठरणाऱ्या सर्व गोष्टी गाडण्यासाठी ती क्रांतीप्रवण होऊन झंकारत येते. म्हणूनच ती समाजातील अनिष्ठ प्रथांवर रूढींवर, समाजातील ढोंगी प्रवृत्तींवर, नेत्यांच्या स्वार्थी वृत्तीवर घणाघाती प्रहार करते. हे प्रहार करत असताना स्वत: चिरडले

जाण्याची भीती ती बाळगत नाही. आपल्या पूर्वजांचा तेजस्वी इतिहास ती पाठीवर घेऊन आलेली असल्याने या सैतानी व्यवस्थेबरोबर दोन हात करण्यास ती मागे पांहत नाही.

कवी रत्नाकरांनी विद्यार्थी दशेपासूनच चळवळ पाहिलेली आणि अनुभवलेली असल्याने चळवळीच्या यशापयशावर ते सडेतोडपणे बोलतात. यासाठी त्यांनी गझलेचाही बंध (form) वापरलेला आले. त्यांनी गझलेसारख्या काव्य प्रकारातून सामाजिक विषय हाताळलेला आहे. डॉ. बाबासाहेबाच्या महापरिनिर्वाणानंतर चळवळीची जी अवस्था झाली व त्यासाठी कारण ठरलेली नेते मंडळी या सर्वांवर कवी रत्नाकर पोटतिडकीने बोलतात. बाबासाहेबाच्यानंतर त्यांच्या स्वप्नांचा चुराडा स्वकियांनी सत्तेसाठी कसा केला. 'रिपब्लिकन पार्टी'ची कशी शकले झाली. जो तो आपणच नेता बणण्याच्या वादात समाजात कशी फूट पडली या सर्वांचा मर्मभेदक वेध कवी रत्नाकरांनी आपल्या कवितेत घेतलेला आहे.

> "पक्षाचा जाहिरनामा कलम एक नामांतर
> सत्तेसाठी फाटाफूट किती गट समांतर ?
> सत्तेसाठी युती केली युतीसाठी युती गेली
> युतीसंगे त्यांनी केले चळवळीचे हस्तांतर
> एकता परिषदेत ज्यांनी फोडल्या डरकाळ्या
> ऐक्य मोडीत काढून त्यांनीच केले स्थलांतर."[४]

कवी डी.बी. रत्नाकरांच्या कवितेने डॉ. बाबासाहेबाचा विचार प्रमाण मानलेला आहे. ती बुद्धांच्या सम्यक विचारालाही प्रमाण मानते. वास्तविक इथल्या धार्मिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आराजकावर बोलत असताना रत्नाकरांची कविता नवनिर्माणाचे, नवसृजनाचे मार्गही सुचवते. याचा अर्थ असा की, ही कविता क्रांतीसाठी, नवनिर्माणाच्या नव्या पहाटेसाठी स्वागतशील आहे. यामुळेच
१ जातीपातीला, धर्मव्यवस्थेला गाढव लावून हॉटेलसारखी समता या देशात प्रस्थापिण्यासाठी ती सज्ज आहे. ही सज्जता, स्वागतशीलता या कवितेत सहजासहजी आलेली नाही. त्यासाठी कवीने जे सोसले आहे जे भोगले आहे त्यातून तावून सुलाखून निघाल्याने डॉ. बाबासाहेबाच्या विचार क्रांतीची बांधिलकी असल्याने व गौतम बुद्धांच्या सम्यक विचारांचा वारसा असल्यानेच ही स्वागतशीलता कवी रत्नाकरांच्या कवितेमध्ये आलेली आहे.

तिसऱ्या पिढीच्या कवितेचा विचार करत असताना ही कविता आपली अशी नवसंस्कृती, नवे संदर्भ तयार करून पाहतेय, याचे चित्र १९८० नंतरच्या कवितेमध्ये कमी अधिक प्रमाणात दिसू लागलेले आहे. रत्नाकरांची कविता ही याच प्रकारातील आहे. ज्या धर्मव्यवस्थेने हजारोंच्या समाजाला ज्ञान, विज्ञान, स्वाभिमानापासून वंचित ठेवले, तो धर्म ती संस्कृती ही कविता आपली मानत नाही. म्हणून जिथं समता आहे, स्वाभिमान आहे अशी बामयानातील बौद्ध राजाची संस्कृती तीच खरी आमची संस्कृती आहे. या तिसऱ्या पिढीची कविता याच संस्कृतीतली नवी मिथके घेऊन नवे संदर्भ घेऊन आविष्कृत होते आहे. डी.बी. रत्नाकरांची कविता ही या परंपरेच्या अग्रभागी आहे.

राजकीय व सामाजिक जीवनातील अध:पतन वैयक्तिक जीवनातही सर्व दूर पसरलेले पाहून कवी रत्नाकरांचे मन व्यथित झालेले आहे. असे असले तरी त्यांची कविता मात्र इथेच थांबत नाही. ती परिवर्तनाच्या चळवळीतून या नैतिक अराजकाला संपवून नव्या अनुशासन पर्वाला सुरुवात करते. ही सुरवात स्वत: सैतानाच्या खांबावर दगड मारून करते. हे या कवितेचे वेगळेपण आहे. सैतान कधीही माणसांशी सलगीने वागत नाही. म्हणून हा सैतानाचा खांब तळापासून उद्‌ध्वस्त करून नैतिक आराजकाला कायमची तिलांजली देऊन हाजची नवी ललाटी आणण्यासाठी कवी रत्नाकराची कविता तयार झालेली आहे. कारण हा सैतानाचा खांब जसा खलनायकी प्रवृत्तीचा प्रतीक आहे तसा तो सामाजिक, नैतिक आराजकाचेही प्रतीक आहे. या आराजकाला संपविताना आपण चिरडून जाण्याची भीती कवीला वाटत नाही.

''हे बुद्धा
हे बौद्ध राजा
मला सैतानाच्या खांबावर दगड मारू दे
माझ्या अधर्मी मक्केतील सर्वदूर पसरलेल्या.
अहिंसक गर्दीला
हाज यात्रेची ललाटी येऊ दे
भय नाही मला
माझ्या चिरडण्याचे
सैतानाच्या खांबावर मला दगड मारू दे
मला दगड मारू दे
सैतानाचा खांब उध्वस्त करू दे.''[५]

सैतानाचा खांब उध्वस्त करून नव्या बौद्ध संस्कृतीचा अंगीकार ही कविता करू पाहतेय, हेच कवी रत्नाकरांच्या कवितेचे बलस्थान आहे. कवी रत्नाकरांची कविता ही विधान करते आणि असे सार्वकालिक विधान करणे हे रत्नाकरांच्या कवितेचे दुसरे बलस्थान आहे.

कवी रत्नाकरांच्या काव्यलेखनावर कवी नामदेव ढसाळ यांचा प्रभाव आढळतो. ज्याप्रमाणे कवी नामदेव ढसाळ आपल्याला हवा असणारा आशय मांडण्यासाठी भाषेची मोडतोड करतात. त्याचप्रमाणे कवी रत्नाकरही आपल्या काव्यात भाषेची मोडतोड करून नवनव्या शब्दांची निर्मिती करताना दिसतात. कवी रत्नाकरांची कविता ही प्रामुख्याने मुक्त छंदात असली तरी, बाह्य सजावटीपेक्षा त्यांनी आशयाला महत्त्व दिलेले आहे. ज्या सामाजिक परिस्थितीतून कवी रत्नाकर आलेले आहेत त्या व त्यांनी पाहिलेल्या अनुभवलेल्या चळवळी, घटना, प्रसंग, यांचे पडसाद त्यांच्या कवितेत उमटलेले आहेत. वास्तविक ही कविताच एका सच्चा आंबेडकरी कार्यकर्त्यांची असल्याने तिचा केंद्रबिंदू हा माणूस आहे. ती माणसापासून सुरू होते व माणसापाशीच थांबते. म्हणून या कवितेचे वाङ्मयीन मूल्य श्रेष्ठ दर्जाचेच आहे.

-----

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | रत्नाकर धम्मपाल | : | हॉटेल माझा देश, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. (१९९२), 'माझ्या देशाविषयी (मनोगत)'. |
| २) | रत्नाकर धम्मपाल | : | लक्तरांची गझल, नीहारा प्रकाशन, पुणे, प्र.आ. डिसेंबर, १९९४, 'लक्तरांची गझलविषयी', पृ.क्र.६. |
| ३) | रत्नाकर धम्मपाल | : | 'हॉटेल माझा देश', पृ.क्र.६२. |
| ४) | रत्नाकर धम्मपाल | : | 'लक्तरांची गझल', पृ.क्र.१३. |
| ५) | रत्नाकर धम्मपाल | : | 'सैतानाच्या खांबावर', समृद्धी प्रकाशन, कोल्हापूर,प्र.आ. डिसेंबर, २००३, सैतानाच्या खांबावर, शीर्षक कविता. |


-----